तात्काळ / कालमर्यादित

प्रथम प्राधान्य

महाराष्ट्र शासन

# शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे-१ यांचे कार्यालय


१७ डॉ बाबासाहेब आंबेडकर रोड, लालदेऊळाजवळ, पुणे-१

दूरध्वनी क्रमांक०२०-२६१२५६९६ -फॅक्स नं.- ०२०-२६१२२२१७

ई-मेल आय डी. = dydpune@gmail.com वेब साईट आय.डी.क्र. www.dydepune.com


जा.क्र./शिउसं/शिष्य./उमाशि ४/पुवि/१७-१८/ e2e9 दि. १५ /१२/२०१७.

21 DEC 2017

प्रति,
मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,
(प्राथमिक / माध्यमिक शिक्षण विभाग),
जिल्हा परिषदा पुणे / सोलापूर / अहमदनगर.

विषयः-सन २०१७-१८ करीता **MAHADBT** महाडिबीटी पोर्टल वरील योजनेची माहिती ऑनलाईन पध्दतीने भरण्याऐवजी ऑफ लाईन पध्दतीने योजना राबविणेबाबत.

संदर्भ:-मा. शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. शिष्य./१७-१८/डीबीटी/अंमलबजावणी/२२४/ दि. १३.१२.२०१७ चे पत्र.

महोदय,

उपरोक्त संदर्भिय पत्राचे विषयानुसार आपणांस सर्वांना कळविण्यांत येते की, सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षासाठी ऑनलाईन स्कॉलरशिपच्या MAHADBT या ऑनलाईन पोर्टलचे कामकाज सद्या चालू असल्याने, खालील नमूद केलेले शिष्यवृत्ती योजनांचे विद्यार्थ्यांची आवेदन पत्रे ऑफ लाईन पध्दतीने स्विकारण्याचे संदर्भिय पत्रात सूचित केलेले आहेत.

१. उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ५ वी ) व माध्यमिक शिष्यवत्ती परीक्षा (इ.८वी) सन २०१५.
२. कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शासकीय खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती.
३. आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांना राज्य शासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती.
४. संस्कृत शिष्यवृत्ती.

सद्यस्थितीत सदर पोर्टलवर काही विद्यार्थ्यांना अर्जामध्ये नोंदी करतांना अडचणी येत आहेत, त्याबरोबर विद्यार्थ्यांचे परिपूर्ण अर्ज शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाकडून शासकीय कार्यालयांकडे पाठविण्यांस अडचणी येत असल्याने आणि सन २०१७-१८ च्या पहिल्या सत्रासाठी सदरहू पोर्टलचे पूर्णतः कार्यान्वयन होणे बाकी आहे. त्यामुळे योजनांच्या प्रदानाची रक्कम MAHADBT पोर्टलव्दारे विद्यार्थ्यांना उपलब्ध करण्यास काही अवधी लागणार असल्याने, उपरोक्त चार योजना MAHADBT पोर्टलवरुन वगळण्यात आल्या आहेत. अ.क्र. २,३ व ४ योजनांची कार्यवाही यापूर्वी ज्या पध्दतीने ऑफ लाईन व्दारा करण्यात येत होती. त्याचप्रमाणे करुन आधार कार्ड क्रमांक संलग्नित बँक खात्यावर विद्यार्थ्यांना सदर योजनेचा लाभ देण्यात यावा. तसेच अ.क्र.१ बाबत उच्च प्राथमिक (इ.५ वी) व माध्यमिक (इ.८वी) शिष्यवृत्ती योजनेची ऑनलाईन पध्दतीने माहिती भरण्यासाठी www.eduonlinescholarship.com या संकेतस्थळावर सुविधा उपलब्ध करुन देण्यात येईल. असे मा. शिक्षण संचालकांनी संदर्भिय पत्राव्दारे सर्व कार्यालयांना सूचित केले आहे. त्याप्रमाणे आपल्यास्तरावर योग्य ती कार्यवाही होणेस विनंती आहे.

आपली विश्वासू,

(मिनाक्षी राऊत)
सहा.शिक्षण संचालक,
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालय

शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग पुणे -१, यांचे कार्यालय
21 DEC 2017
e2e9
जावक क्र.

सोबत :- संदर्भिय पत्राची प्रत.

प्रत:- माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी सविनय सादर.
मा. शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
प्रत माहितीस्तव:- शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषदा पुणे/सोलापूर/अहमदनगर.
मुख्याध्यापक / प्राचार्य, सर्व अनुदानित प्राथमिक /माध्यमिक /उच्च माध्यमिक विद्यालये तसेच अनुदानित कनिष्ठ महाविद्यालये.पुणे/सोलापूर/अहमदनगर